आजचा दिनविशेष
१९७० : भारतीय बनावटीचे पहिले मिग लढाऊ विमान हवाई दलाला देण्यात आले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ


dainiklokaarambh@gmail.com | LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार १९ ऑक्टोबर २०२५ | अंक २९६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism International Pvt. Ltd. Since 2007 | All Tours घर से घर तक | दिल से दिल तक | www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# सण काळवंडला: बाप, मुलगा आणि भाविकांसह ९ ठार, तर आजोबा, मावशी गंभीर जखमी

दिवाळीला सुरूवात झाली आहे, आज धनत्रयोदशीचा सण आहे. सणानिमित्त राज्यात, लोकांमध्ये उत्साहाचं वातावरण असून फराळ, खरेदी, फटाके विकत घेणं यामुळे मोठी गर्दी असून सगळीकडे आनंदी वातावरण आहे. मात्र याच समाला, आनंदाला गालबोट लागलं आहे , त्याच कारण म्हणजे राज्यात 2 भीषण अपघातांमध्ये एकूण 9 जण ठार झाले आहेत. नंदुरबार- अस्तंबा यात्रेवरून परत येणाऱ्या भाविकांवर काळाने घाला घातला आहे, भाविकांच्या पिकअप ट्रकला अपघात होऊन 6 जण मृत्यूमुखी पडले. तर दुसरीकडे समृद्धी महामार्गावर वाशिमजवळ इनोव्हा कारच्या भीषण अपघाता झाला असून त्यात तिघांचा जागीच मृत्यू झाला. या दोन्ही अपघातांमुळे हळहळ व्यक्त होत असून अनेक जण जखमी आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अस्तंबा यात्रेवरून परत येणाऱ्या भाविकांचा दुर्दैवी मृत्यू सणासुदीच्या काळात अपघातांचे सत्र सुरूच असून अनेक निष्पाप नागिरकांना जीव गमवावा लागल्याचे समोर आले आहे. नंदूरबार अस्तंबा यात्रेवरून परत येणाऱ्या भाविकांवर काळाने झडप घातली. यात्रेहून परत येणाऱ्या भाविकांच्या पिकअप गाडीला अपघा झाला. चांदशैली घाटात वाहन चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाला, त्यामध्ये 6 भाविकांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.तर 10 पेक्षा अधिक भाविक गंभीर जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. अपघात स्थळी भयानक दृश्य असून तिथे मदत कार्य सुरू आहे. जखमींना तळोदा उपजिल्हा



रुग्णालयात हलवण्याची कार्यवाही सुरू असून तिथे उपचार करण्यात येतील.

अपघाताचे वृत्त समजताच पोलीस यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली.

समृद्धी महामार्गावरील भीषण अपघातात मान्यमार मधील 3 ठार, 5 जखमी

तर वाशिम जिल्ह्यातील मालेगांव ते जउळका रेल्वे दरम्यानच्या समृद्धी महामार्गावरील डव्हा पेट्रोल पंप जवळ रात्री अडीच वाजता च्या दरम्यान भीषण अपघात घडला आहे. मुंबई वरून नागपूर च्या दिशेने जाणाऱ्या कार वरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने भरधाव असलेली कार थेट डिव्हायडरवर जाऊन आदळली, 3 ठार झाले. यात म्यानमार या देशातील 6 जणांच्या एकाच कुटुंबातील 40 वर्षीय वडील आणि 13 वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू झाला तर 63 वर्षीय आजोबा गंभीर जखमी आहेत. आणखीही एका व्यक्तीचा दुर्दैवाने मृत्यू झाला. तर या भीषण अपघातात कुटुंबातील आई,मावशी मामा आणि चालक असे 4 जण जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघात ग्रस्त कार मधील कुटुंब मुंबई वरून जगनाथ पुरी येथे जात होते, असे समजते.या अपघाताची तीव्रता एवढी होती की त्यात कारचा पुढील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला. पुणे-नाशिक महामार्गावर चाकणजवळ भीषण अपघात दरम्यान पुणे-नाशिक महामार्गावर चाकणजवळही भीषण अपघात झाला. झगडेवस्ती परिसरात भरधाव खासगी बस चालकाचा ताबा सुटून बस दुभाजक फोडत विरुद्ध लेनमध्ये गेली आणि तीन दुचाक्या तसेच एका मोटारीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात पाच जण गंभीर जखमी झाले असून सर्वांना चाकणमधील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अधिकृत बैठकीस उपस्थित राहावे -अमर नाईकवाडे.

बीड दि. १८ (प्रतिनिधी):- २०२५ मध्ये होणाऱ्या बीड नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर आबा चव्हाण यांनी महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन केले आहे. ही बैठक १९ ऑक्टोबर २०२५ रोजी, रविवारच्या दिवशी सकाळी ११ वाजता छत्रपती कॅपीटल, मित्रनगर चौक, बीड येथील पक्षाच्या अधिकृत जिल्हा कार्यालयात पार पडणार आहे. या बैठकीचा मुख्य उद्देश म्हणजे नगराध्यक्ष व नगरसेवक पदांसाठी इच्छुक उमेदवारांशी प्राथमिक संवाद साधणे, निवडणुकीसंदर्भातील रणनीती ठरवणे आणि संघटनात्मक बळकटीसाठी पुढील दिशा ठरवणे असे आहे. राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, पक्षाची निवडणूकपूर्व तयारी अधिक सुसूत्र करण्यासाठी ही बैठक अत्यंत गरजेची आहे. इच्छुक उमेदवार, प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी या बैठकीस वेळेत उपस्थित राहून निवडणुकी संदर्भातील सूचना व अडीअडचणी मांडाव्यात असे आवाहन त्यांनी केले. बूथ स्तरावर पक्षाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आणि आगामी – निवडणुकी संदर्भात योग्य निर्णय घेण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांनी पत्रकार द्वारे केले आहे.

## दिवाळीवर पावसाचे सावट, १३ जिल्ह्यांना यलो अलर्ट, तुमच्या शहरात हवामान कसे असेल ?

राज्यात सध्या सर्वत्र दिवाळीमुळे आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे. मात्र, मान्सूनच्या वाढलेल्या मुक्कामामुळे आता अनेकांच्या दिवाळीचा हिरमोड होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील हवामानाने सध्याच्या ऑक्टोबर महिन्यात मोठा बदल होण्याची शक्यता वर्तवली आहे. आज 19 ऑक्टोबर रोजी राज्याच्या विविध भागांत संमिश्र हवामान पाहायला मिळत आहे. हवामान विभागाने कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील एकूण 13 जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. यामुळे ऐन दिवाळीत अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

सर्वत्र पावसाचा इशारा

राज्याच्या पश्चिम किनारपट्टीसह पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रातील काही भागांमध्ये 19 ऑक्टोबरला विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच कोकण किनारपट्टी लगत मुंबई, पालघर आणि ठाणे वगळता रायगड, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या जिल्ह्यात यलो अलर्ट देण्यात आला आहे. यामुळे सर्वत्र पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच पुणे, कोल्हापूर, सातारा आणि घाटमाथा परिसरात पाऊस कोसळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस होईल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तसेच सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांतही ढगांच्या गडगडाटासह हलक्या सरी कोसळतील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

कोरड्या आणि उष्ण हवामानाचा जोर कायम राहणार

नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांसाठी पावसाचा इशारा आहे. अहिल्यानगरसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. धुळे, नंदुरबार आणि जळगावमध्ये कोरडे हवामान राहणार आहे.

## पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी अनाथ मुलांसोबत साजरी केली दिवाळी

### मुलांसोबत पणती रंगविण्यात आणि आकाश कंदील बनविण्यात उत्साहाने घेतला सहभाग

मुंबई, दि. १८ : दिवाळीचा सण म्हणजे फक्त दिव्यांचा, फटाक्यांचा किंवा सजावटीचा उत्सव नाही तर तो माणुसकीचा, प्रेमाचा आणि एकोप्याचा उत्सव आहे, हा विचार करून पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी आज एका आगळ्यावेगळ्या आणि हृदयस्पर्शी कार्यक्रमात अनाथ मुलांसोबत दिवाळी साजरी केली. या मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून मंत्री श्रीमती मुंडे भावूक झाल्या.

केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालय आणि द चिल्ड्रन्स एड सोसायटी फॉर अंडरप्रिव्हिलेज्ड किड्स ऑर्फनेजच्या यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय आधुनिक कला दालन, मुंबई येथे आयोजित



कार्यक्रमात श्रीमती मुंडे यांनी भेट दिली. यावेळी आधुनिक कला संग्रहालयाच्या संचालक निधी चौधरी उपस्थित होत्या.

मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, ही अनाथ मुलं कोणत्या जातीची, धर्माची आहेत हे महत्त्वाच नाही, तर ती माणसाची आहेत आणि त्यांच्या डोळ्यांतील आनंद हा समाजासाठी प्रेरणादायी आहे. असा समाज घडला पाहिजे, जिथे प्रत्येक माणूस स्वतःची ओळख स्वतः निर्माण करेल.

प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी पर्यावरण विभागाने समाज माध्यमांद्वारे जनजागृती केली आहे, असे सांगून सर्व नागरिकांनी प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. आपण ध्वनी आणि वायू प्रदूषण टाळून, निसर्गाशी सुसंगत अशी पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करू, असे श्रीमती मुंडे म्हणाल्या.

यावेळी मंत्री पंकजा मुंडे यांनी मुलांसोबत आकाशकंदील तयार केले. तसेच पणत्या रंगवल्या आणि चित्रकला उपक्रमात सहभागही घेतला. या वेळी आकाश कंदील बनविण्याची कार्यशाळेचे आणि प्रसिद्ध कलाकार ए. ए. अल्मेलकर यांच्या कलाकृतीच्या प्रदर्शनाचे उद्घाटन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

## बीड न.प.निवडणूकीसाठी राष्ट्रवादीची महत्वाची बैठक

### कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे ॲड.राजेश्वर चव्हाण, बळीराम गवते यांचे अवाहन

बीड: राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट) बीड जिल्ह्याच्या वतीने आगामी बीड नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर दि.१९ ऑक्टोबर रोजी महत्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस राष्ट्रवादीचे कार्यकर्ते, इच्छूक उमेदवारांनी उपस्थित रहावे, असे अवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी केले आहे. सदरील बैठक दि.१९ ऑक्टोबर २०२५ वार रविवार रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा कार्यालय, छत्रपती कॅपीटल, मित्रनगर चौक, बीड येथे घेण्यात येणार आहे. या बैठकीत नगराध्यक्ष





आणि नगरसेवक पदांकरिता निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांशी प्राथमिक चर्चा व निवडणुकीचे नियोजन करण्या हेतू राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयामध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. बीड नगर पालिका निवडणूकीच्या दृष्टीने पक्ष बळकटीकरण करणे, शहरात पक्षपदाधिकारी यांना ताकद देणे, महत्वाच्या जबाबदारी सोपविणे, योग्य उमेदवारांची निवड आणि आगामी निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेणे, या प्रमुख उद्दिष्टांसाठी ही बैठक अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी वेळेवर उपस्थित राहून पक्ष संघटनाच्या बळकटीसाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, बीड शहरातील सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांनी या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी केले आहे.

## पूरग्रस्त बांधवांसाठी पुणे आंबेगावहून किराणा किटचे वाटप.




बीड(प्रतिनिधी)बीड जिल्ह्यात मागील महिन्यात जोरदार पाऊस झाल्याने पूरपरिस्थिती निर्माण झाली होती.यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. काही खेडेगावात तर पुराच्या पाण्यात अडकलेल्या नागरिकांना हेलिकॉप्टरच्या सहाय्याने नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले होते.

जिल्ह्यातील पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी आज दिनांक 18 ऑक्टोबर रोजी आंबेगाव (मंचर, जि. पुणे) येथील तहसीलदार नागटिळक साहेब व नायब तहसीलदार प्रशांत जाधवर (बीड) यांच्या नियोजनातून, भैरवनाथ पतसंस्था व आंबेगाव येथील जनतेच्या पुढाकाराने पूरग्रस्त बांधवांसाठी मोठ्या प्रमाणात मदतीचा हात पुढे करण्यात आला आहे. या किडचे वाटप बीड तहसील कार्यालय तसेच बीड जिल्ह्यातील विविध गावात वाटप करण्यात आले.

## गडकिल्लूयांसाठी स्वतंत्र वैधानिक महामंडळ स्थापन करा

### बीडचे खा.बजरंग सोनवणे यांचे मुख्यमंत्री फडणविस यांना पत्र

बीड: महाराष्ट्र हे गड-किल्ल्यांचे राज्य म्हणून ओळखले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अदम्य पराक्रमाचे, मराठा साम्राज्याच्या वैभवाचे आणि आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे हे गड-किल्ले जिवंत प्रतीक आहेत. तथापि, आज या अनेक ऐतिहासिक दुर्गाची स्थिती अतिशय दयनीय असून, दुर्लक्ष, हवामानातील बदल, अनियंत्रित पर्यटन आणि देखभाल अभावी त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. यामुळे राज्यातील ऐतिहासिक व पौराणिक गड-किल्ल्यांचे संरक्षण, संवर्धन व पुनर्वभवासाठी स्वतंत्र वैधानिक महामंडळ स्थापन करावे, अशा मागणीचे पत्र बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांना दिले आहे. मुख्यमंत्री फडणविस यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, राज्याच्या विविध विभागांद्वारे गड-किल्ल्यांचे संरक्षण व संवर्धनाची कामे सध्या होत असली, तरी ती तुकड्या-तुकड्यांनी आणि मर्यादित अधिकार व निधीच्या अभावामुळे प्रभावी



ठरत नाहीत. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने महाराष्ट्र गड-किल्ले संवर्धन व विकास महामंडळ या नावाने वैधानिक अधिकार असलेले स्वतंत्र महामंडळ स्थापन करणे अत्यावश्यक ठरते. या महामंडळाला राज्यातील सर्व ऐतिहासिक व पौराणिक गड-किल्ल्यांचे सर्वेक्षण, वर्गीकरण व संवर्धन आराखडा तयार करणे, प्रत्येक गडासाठी ऐतिहासिक व वास्तुशास्त्रीयदृष्ट्या योग्य अशा पुनर्वैभव आराखड्याची अंमलबजावणी, गडांच्या परिसरातील भूमी, बांधकामे, प्रवेशमार्ग, पाणीपुरवठा, स्वच्छता व सुरक्षा या सुविधा विकसित करणे, स्थानिक स्वयंसेवी संस्था, इतिहास अभ्यासक, पर्यटन व सांस्कृतिक विभाग यांच्यात समन्वय साधून दीर्घकालीन जतन योजना राबविणे, वार्षिक अर्थसंकल्पात या महामंडळासाठी स्वतंत्र निधी तरतूद करणे इत्यादी जबाबदारी व अधिकार देण्यात यावेत. राज्याच्या अस्मितेचा आणि पर्यटन विकासाचा केंद्रबिंदू असलेल्या या गड-किल्ल्यांना पुन्हा पूर्ववैभव प्राप्त व्हावे, हे महाराष्ट्राच्या प्रत्येक नागरिकाचे स्वप्न आहे. ते साकार करण्यासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना ही काळाची गरज आहे. गांभीर्याने विचार करून, लवकरात लवकर अशा महामंडळाच्या स्थापनेचा निर्णय घ्यावा, असेही म्हटले आहे. खा.बजरंगे सोनवणे हे बीड जिल्ह्यातील विविध विकास कामांच्या बाबतीत आवाज उठवित आहेत. काल किल्ले धारुर दौ-यावर असताना त्यांनी धारुर येथील ऐतिहासिक किल्ल्याची पाहणी केली. महाराष्ट्राचे वैभव असलेल्या गडकिल्ल्यांबाबत सरंक्षण, संवर्धन व पुनर्वैभवासाठी सरकारदरबारी मांडणी करत आहेत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार १९ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



# संपादकीय

## अपराजिताच्या फूलाचे आरोग्यदायी रहस्य ऐकून तुम्ही थक्क



आपल्या आरोग्यास आकार देण्यात आहार सर्वात महत्वाची भूमिका बजावतो. म्हणूनच, आपण आपल्या आहारात अशा गोष्टींचा समावेश करणे महत्वाचे आहे जे आपल्या संपूर्ण आरोग्यास समर्थन देतात, जसे की अपराजिताच्या फुलांपासून बनविलेले हर्बल टी. या फुलाला नीलकंठ फूल किंवा शंखपुष्पी किंवा फुलपाखरू मूत्र फूल असेही म्हणतात. अपराजिता फुलाला धार्मिक महत्त्व देखील आहे. औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण हे सुंदर फूल भगवान शंकराला खूप आवडते.
असे मानले जाते की जर तुम्ही शिवलिंगावर अपराजीचे फूल अर्पण केले तर तुमच्या जीवनात नेहमीच आनंद, यश आणि सकारात्मकता असते. बरेच लोक त्याच्या सौंदर्यामुळे आपल्या बागेत स्थान देतात, परंतु आपल्याला माहित आहे का की त्याच्या फुले आणि इतर भागांमध्ये अँटीऑक्सिडेंट, अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात.
अशा परिस्थितीत, आपण याच्या सेवनाने अनेक आरोग्य फायदे देखील मिळवू शकता. चला तर मग जाणून घेऊया त्यांच्याबद्दल. त्याच्या गुणधर्मांमुळे आपण अपराजिता फुलाचे आरोग्य फायदे देऊ शकता. हे मेंदू आणि पचनक्रियेसाठी सर्वोत्तम मानले जाते. जर तुम्हाला चिंता असेल किंवा खूप तणाव असेल तर त्याच्या फुलांपासून बनवलेला चहा पिणे तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकते. चला तर जाणून घेऊयात अपराजिता फुलाचे आरोग्यदायी फायदे. अपराजिता हर्बल चहा पिऊन तुम्ही तुमच्या तणावाला निरोप देऊ शकता. होय, अपराजिता फुलांपासून बनविलेला चहा तणाव कमी करण्यास, चांगली झोप घेण्यास आणि आपला मूड सुधारण्यास मदत करतो. जर आपल्याला बर्याचदा चिंता किंवा चिडचिडेपणाची लक्षणे आढळली तर आपण हा चहा आपल्या आहारात जोडू शकता. हा चहा बनवायला अतिशय सोपा आहे. आपल्याला फक्त एक कप कोमट उकळत्या पाण्यात 8-10 मिनिटे 5-6 सोयाबीनचे ओतण्याची आवश्यकता आहे. त्यानंतर ते गाळून घ्या. फक्त तुमचा हर्बल चहा तयार आहे. गरम गरम प्या, घोट प्या. हे शक्तिशाली फूल मेंदूच्या आरोग्यास चालना देण्यासाठी देखील खूप फायदेशीर मानले जाते. दररोज या हर्बल चहाचे सेवन केल्याने आपल्याला बुद्धिमत्ता सुधारण्यास, स्मरणशक्ती वाढविण्यास आणि एकाग्रता सुधारण्यास मदत होते. अभ्यासात असे आढळले आहे की हा एक उत्तम नॉट्रोपिक (मेंदू-वर्धक) घटक आहे जो आपण आपल्या आहारात समाविष्ट करू शकता. हा चहा तुम्ही संध्याकाळी किंवा झोपेच्या एक तास आधी घेऊ शकता. चांगले परिणाम मिळविण्यासाठी कमीतकमी 15 दिवस ते प्या. हे दररोज 3 महिन्यांपर्यंत वापरले जाऊ शकते.

# वाचन प्रेरणा दिन व अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा

कोकण मराठी साहित्य परिषद, विरार आयोजित स्वागत अकॅडमी स्कूल, विरार पूर्व येथे. वाचन प्रेरणा दिन १५ ऑक्टोबर रोजी सकाळी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने कोमसाप अध्यक्ष आजीवजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय सुंदररित्या साजरा करण्यात आला.
प्रथम शाळेच्या मराठी शिक्षिका सौ अपर्णा आव्हाड यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि मुख्याध्यापिका सौ शुभांगी ठाकूर यांनी परिचय करून दिला. सौ किशोरी पाटील आणि सौ सुचित्रा पितळे यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेची प्राचीन परंपरा, मराठी भाषा संवर्धन व




वाचनाचे महत्व विशद करून मार्गदर्शन केले. तसेच मुख्याध्यापिका सौ.शुभांगी ठाकूर यांनी पण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तदब नंतर विद्यार्थ्यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या मराठी साहित्याचे अभिवाचन केले. विद्यार्थ्यांनी हे अभिवाचन खूप छान केले. इंग्रजी म ाध्यमाची शाळा असून सुद्धा विद्यार्थ्यांवर मराठी भाषेचे उत्तम संस्कार केले आहेत.. शिक्षक विशेष मेहनत घेताना दिसतात. त्यांना वाचनासाठी प्रोत्साहित केले जाते. *रिडींग कॉर्नर बनवला आहे २०ते २५ विद्यार्थ्यांनी अभिवाचनात हिरहिरीने आणि उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. अभिवाचन झाल्या वर त्यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले तेव्हा प्रशस्तीपत्र बघून विद्यार्थी एकदम खुश झाले. मुख्याध्यापिका सौ शुभांगी ठाकूर सह शिक्षिका अपर्णा आव्हाड यांनी कार्यक्रमासाठी विशेष मेहनत घेतली.
अतिशय सुंदर अनुभव आणि शाळेची शिस्त अगदी वाखाणण्याजोगी आहे.
अशा रितीने आजचा अप्रतिम असा कार्यक्रम यशस्वी झाला.
वाचन प्रेरणा दिन एक अविस्मरणीय अनुभव आणि आठवण

सौ. किशोरी शंकर पाटील विरार

# नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित तेवीस जिल्ह्यातील 33 लाखापेक्षा जास्त् शेतकऱ्यांना 3 हजार 258 कोटीची मदत वितरणास मान्यता

## मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील मागील सात दिवसात सुमारे पाच हजार कोटींवर मदत

यंदाच्या खरीप हंगामातील नुकसानीपोटी आतापर्यंत सात हजार ५०० कोटीची मदत
मुंबई दि.१८ :- राज्यात सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्यास शासन संवेदनशीलपणे काम करत आहे. बाधित शेतकऱ्यांना तत्काळ मदत व्हावी म्हणून २३ जिल्ह्यातील ३३ लाख ६५ हजार ५४४ शेतकऱ्यांच्या २७ लाख ५९ हजार ७५४.७७ हेक्टर क्षेत्रावरील बाधित पिकांच्या मदतीसाठी तीन हजार २५८ कोटी ५६ लाख ४७ हजार इतका निधी वितरित करण्यास शासनाने मान्यता दिली असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुखमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मदत व पुनर्वसन विभागामार्फत नैसर्गिक आपत्तीत बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्यासाठी युद्ध पातळीवर काम केले जात आहे. मागील सात दिवसात सुमारे पाच हजार कोटीवर निधी वितरित करण्याचे आदेश निर्गमित केले असून यंदाच्या खरीप हंगामातील नुकसानीपोटी आतापर्यंत सुमारे सात हजार ५०० कोटीची मदत वितरणास मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे आपदग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळून त्यांचे जीवन अधिक सुकर होईल, असा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री श्री.जाधव पाटील यांनी व्यक्त केला आहे.
नागपूर विभागातील तीन लाख ७६ हजार ९६८ शेतकऱ्यांच्या तीन लाख ४४ हजार ६२९.३४ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ३४० कोटी ९० लाख ८ हजार निधीचा समावेश आहे. नागपूर - एक लाख २ हजार ८५० शेतकऱ्यांच्या ८५ हजार ६४१.८८ हेक्टर क्षेत्रासाठी ११२ कोटी ३७ लाख रुपये. चंद्रपूर- ९३ हजार ८९५ शेतकऱ्यांच्या ८१ हजार ७२६.८० हेक्टर क्षेत्रासाठी ६९ कोटी ४६ लाख ८६ हजार रुपये. वर्धा- एक लाख ४९ हजार ५४६ शेतकऱ्यांच्या एक लाख ६७ हजार ४७६.९६ हेक्टर क्षेत्रासाठी १४२ कोटी ४० लाख ११ हजार रुपये. भंडारा- १८ हजार ९५३ शेतकऱ्यांच्या ६ हजार ४२५.४१ हेक्टर क्षेत्रासाठी १० कोटी ४८ लाख ३६ हजार रुपये. गोंदिया- सहा हजार ३९८ शेतकऱ्यांच्या दोन हजार ३०९.४६ हेक्टर क्षेत्रासाठी तीन कोटी ५० लाख २१ हजार रुपये. गडचिरोली- पाच हजार ३२६ शेतकऱ्यांच्या एक हजार ४८.८३ हेक्टर क्षेत्रासाठी दोन कोटी ६७ लाख ५४ हजार रुपये.
अमरावती विभागातील चार लाख ७८ हजार ९०९ शेतकऱ्यांच्या पाच लाख २६ हजार ३८१.३६ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ४६३ कोटी ८ लाख ३० हजार निधीचा समावेश आहे. अकोला- दोन लाख ९ हजार ४५४ शेतकऱ्यांच्या एक लाख ७२ हजार ८७५.१९ हेक्टर क्षेत्रासाठी १६२ कोटी ९५ लाख ३४ हजार रुपये. अमरावती- ४८ हजार ७१ शेतकऱ्यांच्या ४५ हजार ८८२.७४ हेक्टर क्षेत्रासाठी ३८ कोटी ४ लाख ५१ हजार रुपये. यवतमाळ- दोन लाख २१ हजार ३८४ शेतकऱ्यांच्या तीन लाख ७ हजार ६२३.४३ हेक्टर क्षेत्रासाठी २६२ कोटी ८ लाख ४५ हजार रुपये.
पुणे विभागातील आठ लाख २५ हजार १८९ शेतकऱ्यांच्या सात लाख नऊ हजार २०९.१५ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ९५१ कोटी ६३ लाख ३७ हजार निधीचा समावेश आहे. सातारा- तीन हजार ३८८ शेतकऱ्यांच्या एक हजार ५६२.६७ हेक्टर क्षेत्रासाठी दोन कोटी ४९ लाख ५ हजार रुपये. सोलापूर- सहा लाख ७८ हजार ५९२ शेतकऱ्यांच्या पाच लाख ३८ हजार ८८९.५४ हेक्टर क्षेत्रासाठी ७७२ कोटी ३६ लाख ४५ हजार रुपये. पुणे- ५२ हजार ७८९ शेतकऱ्यांच्या २१ हजार ९५१.९४ हेक्टर क्षेत्रासाठी ३४ कोटी ४२ लाख ८७ हजार रुपये. सांगली - ९० हजार ४२० शेतकऱ्यांच्या एक लाख ४६ हजार ८०५ हेक्टर क्षेत्रासाठी १४२ कोटी ३५ लाख रुपये.
नाशिक विभागातील १५ लाख ७९ हजार २३९ शेतकऱ्यांच्या ११ लाख ५० हजार ३०१.७६ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १४७४ कोटी ८४ लाख ९ हजार निधीचा समावेश आहे. नाशिक - चार लाख नऊ हजार ४७४ शेतकऱ्यांच्या दोन लाख ८८ हजार ८०६ हेक्टर क्षेत्रासाठी ३१७ कोटी १५ लाख ७७ हजार रुपये. धुळे - १६ हजार ३५७ शेतकऱ्यांच्या ११ हजार ५९४.१९ हेक्टर क्षेत्रासाठी १० कोटी २२ लाख ९७ हजार रुपये. नंदुरबार- ९३१ शेतकऱ्यांच्या ४४५.०६ हेक्टर क्षेत्रासाठी ५३ लाख ९९ हजार रुपये. जळगाव - तीन लाख २५ हजार ३५९ शेतकऱ्यांच्या दोन लाख ४७ हजार २६२.०१ हेक्टर क्षेत्रासाठी २९९ कोटी ९४ लाख ४७ हजार रुपये. अहिल्यानगर - आठ लाख २७ हजार ११८ शेतकऱ्यांच्या सहा लाख दोन हजार १९४.५० हेक्टर क्षेत्रासाठी ८४६ कोटी ९६ लाख ८९ हजार रुपये.
कोकण विभागातील एक लाख पाच हजार २३९ शेतकऱ्यांच्या २९ हजार २३३.१६ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी २८ कोटी १० लाख ६३ हजार निधीचा समावेश आहे. ठाणे- ३५ हजार ६७६ शेतकऱ्यांच्या नऊ हजार ४८०.११ हेक्टर क्षेत्रासाठी आठ कोटी ३७ लाख ६५ हजार रुपये. पालघर- ४९ हजार ५१७ शेतकऱ्यांच्या १३ हजार ७४४.२३ हेक्टर क्षेत्रासाठी १४ कोटी ४२ लाख ७ हजार रुपये. रायगड- १८ हजार ५७८ शेतकऱ्यांच्या पाच हजार ८२९.४६ हेक्टर क्षेत्रासाठी पाच कोटी नऊ लाख ९ हजार रुपये. रत्नागिरी- एक हजार १५३ शेतकऱ्यांच्या १०३.८८ हेक्टर क्षेत्रासाठी १३ लाख ५३ हजार रुपये. सिंधुदुर्ग- ३१५ शेतकऱ्यांच्या ७५.४८ हेक्टर क्षेत्रासाठी आठ लाख २९ हजार रुपये.

# चला घेवू एकच वसा, मराठीला बनवू ज्ञानभाषा - डॉ. वसुदेव ( बप्पा ) गायकवाड

केज/ प्रतिनिधीस्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे दिनांक १५ - १० -२०२ ५ रोजी "डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती ". अर्थात " वाचन - प्रेरणा दिन" घेवू चला एकच वसा, मराठीला बनवू ज्ञानभाषा " हे घोषवाक्य प्रमाणभूत मानून " ग्रंथप्रदर्शन, ग्रंथवाचन, विश्व कोषाबाबत माहिती व कार्यशाळा, व्याख्यान, सामुहिक वाचन, चर्चा चर्चासत्र, कार्यगौरव, साहित्यीकांची मुलाखत, ग्रंथभेट आदी सांस्कृतीक कार्यक्रम साजरे करून " वाचन - प्रेरणा दिन" साजरा करण्यात आला. सकाळी ०८ ते रात्री ०८ पर्यंत विविध कार्यक्रम व उपक्रम साजरे करण्यात आले. ". चला घेवया एकच वसा, मराठीला बनवू ज्ञानभाषा " याचे नियमित पालन करन मराठी ज्ञानभाषा बनवण्यासाठी प्रत्येक मराठी साहित्य वाचावे व जपावे असे अवाहन ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाज समाजसेवक सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्यात डॉ. वसुदेव ( बप्पा) गायकवाड यांनी " व्याख्यान" प्रसंगी अवाहन केले.सर्व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच शिवाजीराव गायकवाड हे होते. सर्वप्रथम डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेल मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले व सर्व कार्यक्रमाचे उद्घाटनही करण्यात आले. विश्वकाषाबाबत माहिती व कार्यशाळेत दादासाहेब गायकवाड,ज्ञानोबा भोगजकर, डॉ. वसुदेव ( बप्पा) गायकवाड यांनी




मार्गदर्शन केले.ग्रंथभेट २० वाचकांना देण्यात आले.सामुहिक वाचन करण्यात आले. तसेच वयक्तीक ग्रंथवाचनही करण्यात आले. साहित्यीक, कवी प्रा. माणिकराव आनंदगांवकर यांची मुलाखत सेवानिवृत्त शिक्षक रामकृष्ण( तात्या) गायकवाड यांनी घेतली. तसेच जेष्ठ साहित्यीकांचा सत्कार रविंद्र गायकवाड( पेन्टर) यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार, ग्रंथभेट देऊन करण्यात आला. ग्रंथ प्रदर्शनात माजी सरपंच रामराजे गायकवाड, रावसाहेब जाधव, आरुण गायकवाड, संजय सोनवणे, आनंद( भैय्या) गायकवाड, बबन पुंड, कृष्णराजे गायकवाड, शिवदास गायकवाड, आर.ए. गायकवाड, कमलाकर साबळे, नारायण गायकवाड, यांच्यासह शेकडो टप्याटप्याने वाचकांनी सहभाग घेतला. सकाळी ०८ ते रात्री ०८ या वेळात सर्व कार्यक्रम संपन्न झाले. अध्यक्षीय समारोप माजी सरपंच शिवाजीराव गायकवाड यांनी केला. सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद( भैय्या ) गायकवाड यांनी केले.

# आरक्षण रद्द होण्याच्या भीतीने मराठा युवकाची आत्महत्या; बीडमध्ये खळबळ

बीड, दि. १८ (प्रतिनिधी):- मराठा समाजाला मिळालेले कुणबी आरक्षण रद्द होईल की काय, या भीतीने बीड तालुक्यातील वरवटी येथील एका २३ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना काल (दि. १८) दुपारी ५ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. विष्णु (शाम) परमेश्वर कोटुळे असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन शासनानेदिलेल्याआरक्षणावरनुकत्याचझालेल्या ओबीसींच्या मेळाव्यातून प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. याच नैराश्यातून विष्णु कोटुळे याने टोकाचे पाऊल उचलल्याचे समोर आले आहे.
नेमके काय घडले?
वरवटी येथील रहिवासी असलेला विष्णु (शाम) परमेश्वर कोटुळे (वय २३) या युवकाने काल दुपारी ५ वाजेच्या सुमारास घरात गळफास लावून घेतला. मराठा समाजाला 'हैदराबाद गॅझेट'नुसार मिळालेले कुणबी आरक्षण रद्द होईल की काय, तसेच बीड येथील नुकत्याच झालेल्या ओबीसींच्या मेळाव्यामुळे आरक्षणावर विपरीत परिणाम होईल, या चिंतेतून त्याने हे पाऊल उचलल्याची माहिती मिळाली आहे.
आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीतील मजकूर हृदयद्रावक
विष्णु कोटुळेच्या खिशात पोलिसांना एक चिठ्ठी मिळाली आहे. त्यामध्ये त्याने आत्महत्या करण्याचे स्पष्ट कारण नमूद केले आहे. चिठ्ठीत त्याने लिहिले आहे की, "मराठा समाजाला कुणबी म्हणून शासनाने काही दिवसापूर्वी जीआर काढला होता, परंतु काल बीडला झालेल्या ओबीसीच्या महायलगार मेळाव्यामुळे मराठा समाजाला दिलेला जीआर (आरक्षण) रद्द






होणार व पुन्हा आम्हाला नोकरी मिळणार नाही या नैराश्यातून मी आज आत्महत्या करत आहे." पुढे त्याने आपल्या समाजासाठी अत्यंत कळकळीची मागणी केली आहे. तो म्हणतो, "माझा मराठा समाज खूप गरीब आहे, मराठा समाजाला दिलेले आरक्षण टिकले नाही तर माझ्यासारखे अनेक मराठा बांधव आत्महत्या करतील." आरक्षण टिकणार की नाही या भीतीने एका तरुण मराठा युवकाने आपले जीवन संपवल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेने बीड जिल्ह्यात खळबळ उडाली असून आरक्षणाच्या मुद्द्यावरून समाजात निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीचे दर्शन घडवले आहे. या घटनेबाबत अधिक तपास पोलीस करत आहेत.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार १९ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



## सोन्याचा भाव जाणार तब्बल 1.32 लाखांवर, तज्ज्ञांच्या अंदाजाने सगळेच चकित!




गेल्या काही दिवसांपासून सोने तसेच चांदी या मौल्यवान धातूंच्या किमतीत सतत वाढ होत आहे. जागतिक मध्यवर्ती बँका, सोन्याची होत असलेली खरेदी, भू-राजकीय तणाव तसेच आशियातील सोन्याची वाढत मागणी यामुळे सोन्याच भावात वाढ होत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळेच आगामी काळात सोन्याचा भाव तब्बल 4500 डॉलर्स प्रतिऔंस रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मोतीलाल ओस्वाल फायनॅन्शियल लिमिटेडच्या (MOFSL) रिपोर्टनुसार सोने आणि चांदीने या वर्षात आतापर्यंत चांगली कामगिरी केली आहे. त्यामुळे औद्योगिक गरज आणि वाढती मागणी यामुळे भविष्यात चांदीचा दरदेखील 75 डॉलर्स प्रतीऔंसपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.

वर्षभरात 35 वेळा वाढला सोन्याचा भाव

मिळालेल्या माहितीनुसार वर्ष 2025मध्ये सोन्याचा भाव तब्बल 50 टक्क्यांपेक्षा अधिक किमतीने वाढलेला आहे. सध्या सोन्याचा भाव हा 4000 डॉलर्स प्रतिऔंसच्या पुढे गेला आहे. सोन्याने आतापर्यंत 35 वेळा ऐतिहासिक तेजी गाठलेली आहे. वैश्विक अनिश्चितता, अमेरिकेची मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हकडून केली जाणारी संभाव्या व्याजदर कापत यामुळे सोन्याच्या भावात ही वाढ झालेली आहे.

सोनं 1.35 लाख रुपयांवर जाणार, पण अट काय?


MOFSL चे अधिकारी मानव मोदी यांनी सोन्याच्या वाढत्या भावाविषयी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांच्या मतानुसार कमजोर झालेला डॉलर, केंद्रीय बँकांकडून रणनीतीत केले जात असलेले बदल यांच्यामुळे सोन्याचा हा भाव दिसत आहे. MOFSL च्या रिपोर्टनुसार भारतात सोन्याचा भाव सध्या 1.20 लाख रुपये प्रति 10 ग्रॅमवर पोहोचला आहे. आगामी काळात हा भाव 1.35 लाख रुपये प्रति 10 ग्रॅमपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. तर चांदीची किंमतही वर्षभरात आतापर्यंत 60 टक्क्यांनी वाढली असून हा भाव 2.3 लाख रुपये प्रति किलोवर पोहोचण्याची शक्यता आहे. डॉलर आणि रुपयाचा विनिमय दर 89 राहिल्यानंतर सोन्याची ही भाववाढ शक्य असल्याचे MOFSL च्या रिपोर्टमध्ये सांगण्यात आले आहे.

**(टीप- वरच्या लेखात दिलेली माहिती ही प्राथमिक स्वरुपाची आहे. कुठेही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष गुंतवणूक करायची असेल किंवा कोणताही आर्थिक निर्णय घ्यायचा असेल तर त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्या)**

# चकलांबा गणातून पंचायत समिती महेबुब कादरी (उर्फ अमर टेलर) यांनी निवडणूक लढवावी कार्यकर्त्यांची इच्छा माजी ग्रा सदस्य शेख तय्यब गुलाब

चकलांबा प्रतिनिधी :- गेवराई तालुक्यातील आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडत जाहीर झाले असून इच्छुकांनी आपल्या आपल्या मतदारसंघात मोर्चे बांधणी ला सुरुवात केली आहे. त्यातच गेवराई तालुक्यातील महत्त्वाचा मानणारा चकलांबा जि प गट हा ओबीसीला सुटलाआहे व चकलांबा पंचायत समिती गण हा सर्वसाधारण सुटल्यामुळे गेवराई तालुक्याच्या राजकारणातील स्वच्छ प्रतिमेचा मजबूत पकड असणाऱ्या एक महत्त्वाचे मानणारे नेते






गोरगरिबांच्या सुखा -दुःखात नेहमी धावून येणारे केव्हाही गरज तर 24 तास उपस्थित राहुन गोरगरिबाचे कैवारी असणारे जनता त्यांना बाबा म्हणत आमचे बाबा महेबुब कादरी उर्फ ( अमर टेलर)यांनी पंचायत समिती लढवावी अशी त्यांच्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे चकलांबा सर्कल मध्ये यांचा तगडा जनसंपर्क व त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. म्हणून नक्कीच जिल्हा परिषद च्या उमेदवाराला सुद्धा त्यांच्यामुळे खूप मोठा फायदा होईल. तसेच माजी ग्रामपंचायत सदस्य तय्यब गुलाब शेख यांनी प्रसिद्धी पत्रास दिली.

# शिवसेनेत इनकमिंग सुरु..बीड शहरातील बहुसंख्य हिंदू मुस्लिम महिलांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश... बीड जिल्ह्याला गत वैभव प्राप्त करून देऊ.. अंबादास दानवे..





आज दिनांक १८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ठीक चार वाजता महाराष्ट्र राज्याचे माजी विरोधी पक्षनेते तथा शिवसेना नेते अंबादासजी दानवे साहेब यांच्या नेतृत्वाखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या पुढाकाराने, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंगन, युवा नेते बिलाल भाई, यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरातील राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी युवती जिल्हा सचिव नुजहत सिद्दिकी,महिला अल्पसंख्याक शहराचे अध्यक्ष शेख यास्मिन वाहेद, अश्विनी बप्पासाहेब गायके, दीपा दिने जाधव,प्रेरणा यश कसबे, यांच्यासह बीड शहरातील अनेक हिंदू-मुस्लिम महिलांनी छ.संभाजीनगर येथील अंबादास दानवे यांच्या संपर्क कार्यालयात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे बीड शहरातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजित पवार गट यांना मोठा झटका बसलेला आहे व भविष्यात शिवसेनेची ताकद वाढण्यासाठी मोठी मदत होणार आहे.

यावेळी बोलताना शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी असे म्हटले की बीड जिल्हा हा पूर्वीपासूनच शिवसेनेला मानणारा जिल्हा आहे. परंतु शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे साहेबांनी ज्यांना आशीर्वाद देऊन मोठे केले त्यांनी पुढे चालून पक्षासोबत बेईमानी केली परंतु जे निष्ठावंत शिवसैनिक होते किंबहुना आहेत त्यांनी मात्र पक्षाचे इमान कधीही सोडले नाही. जिल्हाप्रमुख गणेश वरेकर हे सुद्धा अत्यंत पोट तिडकेने काम करत आहेत आज बीड शहरातून एवढ्या मोठ्या प्रमाणात हिंदू मुस्लिम महिला एकवटून संभाजीनगर सारखे ठिकाणी प्रवेश करण्यासाठी येतात हे कशाचं धोतक आहे. आता इथून पुढे एक दिलाने काम करून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकरिता यश प्राप्त करण्यासाठी मी सुद्धा बीड जिल्ह्यावर वैयक्तिक लक्ष घालत असून शिवसेनेला पूर्वीसारखे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी मी कायम पाठीशी आहे.

पुन्हा एकदा आपल्याला तळागाळातील बांधणी करायची असून सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी इमाने इतबारे काम करावे व पक्ष संघटना वाढवण्यासाठी साथ द्यावी. यावेळी तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, नुजाहत सिद्दिकी, शेख यास्मिन, बिलाल भाई, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रवेश सोहळ्याच्या कार्यक्रमाला बीड शहरातील हिंदू मुस्लिम महिला व व पुरुष शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# दोन रात्रीच्या घरफोड्या, बस स्टॅन्ड मधील दोन चोऱ्या एक साखळी चोर व सभेमधील एक चोरी असे एकूण ०६ गुन्हे उघड स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी,

बीड: प्रतिनिधी बीड मा.पोलीस अधीक्षक बीड यांनी बीड जिल्हयामध्ये घरफोड्या व चोऱ्या करणाऱ्या इसमांची माहीती काढून कारवाई करण्याचे आदेशित केल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्या दृष्टीने प्रयत्न सुरु केले होते. दिनांक 18.10.2025 रोजी गुप्त बातमीदार मार्फत माहीती मिळाली की माजलगांव शहर पोलीस ठाणे हद्दीत दोन ठिकाणी पिताजीनगरी येथील बंद घर व तुळजाभवानी नगर येथील पत्राचे शेडचे दरवाजा तोडुन रात्रीचे वेळी दोन घरफोडया अमिर उर्फ लंगडा लाला जहागिरखॉन पठाण, रा ढगे कॉलणी बीड व आयान अस्लम शेख रा अजिजपुरा बीड या दोघांनी मिळून केल्याचे तांत्रिक विश्लेषणातुन समोर आल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक त्याचे मागावर असताना गुप्तबातमी मिळाली की त्यापैकी आयान शेख हा बीड मध्ये माने कॉम्पेक्स जवळ उभा आहे लागलीच स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने छापा मारुन आयान शेख पकडले व त्याचे कडुन गुन्हयात चोरी गेलेल्या सोने चांदी व नगदी पैकी 7000 रु नगदी मिळुन आले त्याचे कडुन खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत. 1) पोलीस ठाणे माजलगांव शहर गु.र.नं 340/2025 कलम 331(4), 305 (ए) बी.एन.एस 2) पोलीस ठाणे माजलगांव शहर गु.र. नं 324/2025 कलम 331(4), 305 (ए) बी.एन.एस आरोपी



आयान शेख पास पुढील तपासकामी पोलीस ठाणे माजलगांव शहर यांचे ताब्यात पुढील तपासकामी देण्यात आले आहे. गुन्हयातील दुसरा आरोपी अमिर उर्फ लंगडा लाला जहागिरखॉन पठाण, रा ढगे कॉलणी बीड हा बीड कारागृहात आहे. तसेच दिनांक 14.10.2025 रोजी गेवराई येथील फिर्यादी महीला हि गेवराई येथील बसस्टॅन्डमध्ये शेवगांव येथे जाण्यासाठी बसमध्ये चढ़त असताना गर्दीचा फायदा घेवुन अज्ञात आरोपीने त्याचे गळयातील सोन्याचे लाकिट काढुन घेतले होते तसा पोलीस ठाणे गेवराई येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदरील माहीती स्थागुशा पथकास मिळताच त्याने तपासाचे चक्रे फिरवून बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाचे मदतीने आरोपी मनोज उर्फ शरदया महादेव बहीरवाळ, वय 19 वर्ष, रा माजुली नगर, नाळवंडी नाका, बीड यांनी केल्याचे निष्पन्न करुन त्याचा शोध घेत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की तो परत चोरी करण्यासाठी बीड येथील बसस्थानक जवळ फिरत आहे. सदरील ठिकाणी तात्काळ पथकाने तेथे जावुन त्यास पकडले व त्याचे ताब्यातुन चोरीस गेलेली सोन्याची चैन हस्तगत केली आहे. त्याचे गुन्हा केल्याचे सिध्द झाले आहे. त्याचे कडून खालील गुन्हा उघडकीस आला आहे. पोलीस ठाणे गेवराई 614/2025 कलम 303 (2) बी.एन.एस आरोपी व मुददेमाल पुढील तपासकामी पोलीस ठाणे गेवराई यांचे ताब्यात देण्यात आला असून पुढील तपास गेवराई पोलीस करीत आहे. तसेच दिनांक 17.10.2025 रोजी छत्रपती संभाजी महाराज येथे सभेमधील गर्दीच्या ठिकाणी गर्दीचा फायदा घेवुन तेथील ईसमाचा मोबाईल व नगदी काढून घेणारा ईसम हा जिल्हा परीषद कार्यालय बीठ समोरील धांबता असल्याची माहीती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने आरोपी नितीन अशोक जाधव, वय 30 वर्ष, रा. गांधी नगर, नाळवंडी रोड, बीड यास पकडून चोरीस गेलेला मोबाईल व नगदी रक्कम हस्तगत केले आहे. तसेब त्यास चौकशी करता त्याने ईतर आनखीन दोन ठिकाणी चोरी केल्याचे कबुल केले. त्याने बीड व माजलगांव बसस्टॅन्ड मधुन देखील गर्दीच्या ठिकाणाहून दोन वेगवेगळ्या ईसमांचे नगदी पैसे खिश्यातुन गर्दीचा फायदा घेवुन काढून घेतल्याचे कबुल केले आहे त्याचे कडून खालील प्रमाणे पोलीस ठाणेचे गुन्हे उघडकीस आले आहेत. 1) पोलीस ठाणे बीड शहर गु.र.नं 204/2025 कलम 303 (2) बी.एन.एस 2) पोलीस ठाणे शिवाजीनगर गु.र. नं 454/2025 कलम 303 (2) बी.एन.एस 3) पोलीस ठाणे माजलगांव शहर गु.र. नं 376/2025 कलम 303 (2) बी.एन.एस वरील तिन्ही गुन्हयातील निष्पन्न आरोपी हे पुढील तपासकामी पोलीस ठाणे बीड शहर यांचे ताब्यात देण्यात आला आहे. सदरील कामगिरी श्री नवनित कॉंवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड पांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, महेश विने पोलीस हवालदार विकास राठोड, राहुल शिंदे, अंकुश वरपे, महेश जोगदंड, राजु पठाण, युनुस शेख, गोविंद राख, पोलीस अंमलदार बबन सलगर, बप्पासाहेब घोडके, मनोज परजणे, आशपाक सय्यद, अक्षय नाईकनवरे, विकी सुरवसे चालक पोलीस हवालदार गणेश मराडे, नितीन वडमारे, सुनिल राठोड सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

# हम लड़ेंगे और जीतेंगे..! AIMIM बीड जिल्ह्यात निवडणूक तयारीत एकजूट

बीड: बीड प्रतिनिधी जिल्ह्यातील आगामी नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी All India Majlis-e-Ittehad-ul-Muslimeen (AIMIM) पक्ष जोरदार तयारीत आहे. या पार्श्वभूमीवर आज AIMIM बीड जिल्हा संपर्क कार्यालयात जिल्ह्याच्या सर्व आजी-माजी पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठक AIMIM बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफीक भाऊ यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. बैठकीत जिल्हा उपाध्यक्ष आणि बीड तालुकाध्यक्ष खन्ना भैय्या, युवक जिल्हाध्यक्ष आणि नगरसेवक शेख मतीन, शेख रमीज सर, जिल्हा उपाध्यक्ष शेख युसुफ, बीड शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, अन्वर हाश्मी, हाफेज मुखीद साहेब, शेख अन्वर यासह अनेक नेत्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शनाची जबाबदारी सय्यद सैफअली लालु यांनी पार पाडली. बैठकीत जेष्ठ नेते सलाम सेठ, मा. बीड शहराध्यक्ष शिवाजी भोसकर, शेख सलमान, इद्रीस पाशा, शेख युनुस, हाफेज नवीद साहेब, सिद्दीख भैय्या, वसीम भाई, अफरोज पठाण, मुबीन सहाब, तालेब इनामदार, अजीम भाई, साजन चौधरी, हाफीज अयान साहेब,





शाकेर भाई, अमजद पाशा, हिफाजत पठाण, फहीम भाई, शेख मोहसीन, तौफीक भाई, लियाकत बेग, मार्गदर्शक रियाज खान, सफी दादा, शेख मुदस्सीर, सोहेल शिकलगार, सलाम भाई, मोईज भाई, फारुख खान, अय्युब भाई, अय्युब खान, गाजी खान, सय्यद बासेद इसा खान, अब्बास भाई, रहीम भाई यांसह मोठ्या संख्येने आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत पक्षाच्या आगामी निवडणुकीच्या धोरणावर चर्चा झाली, एकजूट आणि संघटनात्मक तयारीवर भर देण्यात आला. ॲड. शेख शफीक भाऊ यांनी उपस्थितांना उद्देशून सांगितले की, “हम लड़ेगें और जीतेंगे..! प्रत्येक मतदारापर्यंत आपली पोहोच आवश्यक आहे. नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत आम्ही ताकदीने लढणार आहोत.”

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

रविवार १९ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



# घुर्रट भुजबळ, तुटलेल्या चपला, केसांवर फुगे
# मनोज जरांगे पाटलांचा तुफान हल्लाबोल

शुक्रवारी बीडमध्ये ओबीसी नेत्यांची महाएल्गार सभा पार पडली, या सभेमध्ये ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला होता, त्यांनी यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील यांचा उल्लेख अंतरवालीचे दरिंदे पाटील असा केला होता, त्यानंतर आता मनोज जरांगे पाटील देखील चांगलेच आक्रमक झाले आहेत, त्यांनी भुजबळांच्या टीकेला प्रत्युत्तर देताना घणाघात केला आहे. बीडमध्ये झालेला मेळावा हा ओबीसींचा मोर्चा नव्हता, तर तो एका विशिष्ट जातीचा आणि टोळीचा मोर्चा होता हे सिद्ध झाले आहे. त्यांच्या काही गोष्टी बाहेर पडत आहेत, आपण ओबीसी ओबीसी बोंबलायचं आणि मराठा ओबीसींमध्ये तणाव निर्माण करायचा. त्यातून आपलं मंत्रिपद साधायचं, कारण त्या घुर्रट भुजबळांनीच सांगितलं आहे, मी ओबीसी ओबीसी बोंबललो आणि मला न द्यावे लागलेले मंत्रिपद द्यावे लागले, असा हल्लाबोल यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, घुरर्ट छगन भुजबळ यांचे चक्रव्यूह प्रचंड घातक आणि विषारी आहे, या षडयंत्रामध्ये एकदा गुंतलं की बाहेर निघता येत नाही, गोरगरीब मराठा लेकरांचं वाटुळं का करावे? असे पंकजा मुंडे यांना वाटले असावे, यापुढे सुधारणा





करू असं त्यांना वाटले असेल, त्यामुळे पकंजा मुंडे या मेळाव्याला आल्या नसतील असं यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं. दरम्यान मनोज जरांगे पाटील माझ्या मतदारसंघात आले तरी मी निवडून आलो असा दावा शुक्रवारच्या सभेत छगन भुजबळ यांनी केला होता, त्याला देखील जरांगे पाटील यांनी उत्तर दिलं आहे. मी जर खरच आलो असतो, तर भुजबळ यांच्या धुरा उलाल झाल्या असत्या, आता निवडून आल्यावर बोलत आहेत, पण तेव्हा तर ते मला मित्र आहे म्हणाले होते. तेव्हा म्हणाले जरांगे पाटील मित्र आहेत, आले आणि गेले. पण त्यावेळी मी एका सांत्वन भेटीला गेलो होतो. छगन भुजबळ यांची काही दिवसात वाईट अवस्था होणार आहे, तुटलेल्या चपला, केसांवर फुगे असं काही त्यांच्याकडे दिसेल, असंही यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

# विठ्ठल मंदिरातील कर्मचाऱ्यांना चिकन मसाल्याच्या पाकिटांचे वाटप, वारकरी संतापले

देशभरात दिवाळीला सुरुवात झाली आहे. दिवाळीनिमित्त अनेक कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना काहीतरी भेट देत असतात. मात्र पंढरपूरमधून धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वारकरी संप्रदायात शाकाहार हा सर्वश्रेष्ठ हार मानला जातो. मांसाहार, मद्यपान अशा गोष्टींना वारकरी सांप्रदाय विठ्ठल भक्तांमध्ये थारा नाही. मात्र पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बीव्हीजी कंपनीकडून चिकन मसाला भेट देण्यात आला आहे. त्यामुळे वारकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.
बीव्हीजी कंपनीकडून चिकन मसाल्याचे वाटप
विठ्ठल मंदिरामध्ये बीव्हीजी कंपनीकडून आउट




सोर्सिंग पद्धतीने सुरक्षारक्षक व इतर कर्मचारी पुरवले जातात. याच कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून चिकन मसाला देण्यात आला. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर सध्या वारकरी संप्रदायातून चिकन मसाल्याच्या भेटवस्तूबाबत संताप व्यक्त केला जात आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने देखील या कंपनीवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला असून कंपनीला नोटीस बजावली आहे.विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी ही माहिती दिली आहे. कंपनीला नोटीस या प्रकाराबाबत बोलताना विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी म्हटले की, ‘आता दिवाळी सणाला सुरुवात झालेली आहे, मोठ्या प्रमाणात भाविक फक्त पांडुरंगाच्या आणि रुक्मिणी मातेच्या दर्शनाला येत आहेत. आपण सुरक्षारक्षक खाजगी कंपनीकडून घेतलेले आहेत, बीव्हीजी कंपनीकडून सुरक्षारक्षकांना दिवाळीचे गिफ्ट दिले आहे. त्या गिफ्टमध्ये विविध प्रॉडक्ट आहेत,



मराठा समाजासाठी दिवसरात्र झटणारे मनोज जरांगे पाटील यांचं आज एक नवं रूप पहायला मिळालं. जरांगे पाटलांनी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटीमध्ये घोडेस्वारीचा आनंद घेतला. मनोज जरांगे पाटील यांनी काळा चष्मा घातला आणि गळ्यात भगवा पंचा घेत घोडेस्वारी केली. याचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यावेळी बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, ‘आता दिल्ली जायचे आहे कारण मराठ्यांचे अधिवेशन आहे, 70 ते 80 लाख मराठे दिल्ली जाणार आहेत. आता फक्त संपलेल्या लोकांचे नाव काढायचे नाही.’ जरांगे पाटील हे घोडस्वारी करत असताना अनेक मराठा बांधव त्यांच्यासोबत होते. आता काही दिवसांनी हे सर्व मराठा बांधव दिल्लीला जाणार आहेत.

## माजी उपसरपंच गोविंद बर्गे मृत्यू पूजा गायकवाडला मोठा धक्का, अडचणी वाढल्या



काही दिवसांपूर्वी एक धक्कादायक घटना घडली होती, बीड जिल्ह्याच्या गेवराई तालुक्यातील लुखामसला गावचे माजी उपसरपंच गोविंद बर्गे यांनी स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केली, या घटनेनं संपूर्ण राज्यात खळबळ उडाली, गोविंद बर्गे यांनी प्रेमप्रकरणातून आत्महत्या केल्याची माहिती समोर आली होती. नर्तकी पूजा गायकवाड हिच्यासोबत असलेल्या प्रेमप्रकरणातून त्यांनी टोकाचं पाऊल उचललं, दरम्यान या प्रकरणात पूजा गायकवाड सध्या जेलमध्ये आहेत. तिने जामिनासाठी अर्ज केला होता, मात्र तिचा जामीन अर्ज न्यायालयानं फेटाळून लावला आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार प्रेमाच्या जाळ्यात ओढून नंतर अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी पूजा गायकवाड हिने गोविंद बर्गे यांना दिली होती, याच मानसिक तणावातून त्यांनी आत्महत्या केल्याचं बोललं जात आहे. याप्रकरणातील आरोपी असलेल्या नर्तकी पूजा गायकवाड हिचा जामीन अर्ज जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायाधीश व्ही.एस.मलकलपत्ते–रेड्डी यांनी फेटाळून लावला आहे.

# चकलांबा येथील जय हिंद बियर बार वर ग्राहकाला मारहाण
# चकलांबा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद

चकलांबा:प्रतिनिधी-चकलांबा
येथील जय हिंद बियर बार येथे दि.१८/१०/२०२५ शनिवार रोजी रात्री ९वाजण्याच्या सुमारास जेवायला गेले असता ग्राहक जावेद सय्यद व सद्दाम सय्यद यांना बियर बार चे मालक भागवत उत्तम गायकवाड व ओम भागवत गायकवाड व त्याचा मित्र शेख तय्यब रशीद यांनी मिळून जावेद सय्यद याला जुन्या कारणावरून मारहाण केली. नेहमीच जय हिंद बियर बार वर वादविवाद होत राहतात, तरी एस पी साहेबांनी जय हिंद बिअरबारचा परवाना रद्द करण्यात यावा.सातत्याने बीड जिल्ह्यात गुन्हेगारीचे प्रमाण दोन नंबर धंद्यावाल्या मुळे वाढले आहे.वर्दीचा धाक कमी झाला आहे. जय हिंद बियरबार हे फक्त नावालाच बियर बार आहे . येथे इतर पण अवैध धंदे राजरोस पणे जोरात सुरु आहेत. अर्जदार जावेद सय्यद यांनी चकलांबा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद केला असून तरी पुढील कारवाई करून जय हिंद बिअर बारचा सीसीटीव्ही फुटेज चेक करून मला न्याय द्यावा अशी अपेक्षा चकलांबा पोलीस स्टेशन च्या सपोनी संदीप पाटील यांच्याकडून केली आहे.

चक्क बिअर बार मालकांनी व त्याच्या मुलांनी व एका मित्रांनी मिळून मारहाण केली . मारहाण करणारे बारमालक व राजकीय लोक असून बीडमध्ये पोलीस पेक्षा दोन नंबर धंद्यावाल्याची चलती, खाकीचा धाक संपला चकलांबा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद एपीआय संदीप पाटील काय कारवाई करणार याच्यावर लक्ष गरिबाला न्याय भेटणार का **?सामाजिक कार्यकर्ते- राजू सय्यद**

# भुजबळांच्या टीकेनंतर विखे पाटलांचं मोठं विधान, थेट वकिलांसमोरच भुजबळांशी चर्चा

शुक्रवारी बीडमध्ये ओबीसी नेत्यांची महाएल्गार सभा पार पडली, या सभेमध्ये बोलताना ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणावरून राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला होता. विखे आले आणि संपूर्ण महाराष्ट्रात विखार पसरून गेले, गेले तर गेले जीआर पण काढला असं भुजबळ यांनी म्हटलं होतं, दरम्यान त्यानंतर आता भुजबळ यांच्या टीकेला राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. माझी भूमीका स्पष्ट आहे की ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता आरक्षणाचा विषय सोडवला आहे, भुजबळ ज्येष्ठ नेते आहेत. त्यांचा आदर करत आलो आहे. सार्वजनिक जीवनात काम करत असताना ओबीसी मराठा वातावरण कधी





वाटलं नाही. आता सध्या कोर्टात पाच जनहीत याचिका दाखल झाल्या आहेत. पुरोगामी महाराष्ट्रात सगळे एकत्र राहतात सार्वजनिक कार्यक्रम एकत्र करतात. आता दिवाळी साजरी करत आहोत, ओबीसी दिवाळी आणि मराठा दिवाळी असं कधी झालं आहे का? असा सवाल यावेळी राधाकृष्ण विखे पाटील यांनी भुजबळांना केला आहे. दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं आहे की, आमच्या डीएनएमध्ये ओबीसी आहे, त्यामुळे गैरसमज करून घेऊ नये, कायद्याचा चौकटीत बसून मराठवाड्यातील मराठा समाजाचा विषय मार्गी लावला आहे. भुजबळांना भेटणार आहे, आणि त्यांना समजून सांगणार आहे. सोबत न्यायमूर्ती शिंदे यांना पण घेऊन जाणार आहे. ते त्यांना सगळं समजून संगतील, आणि त्यांचा गैरसमज दूर केला जाईल, असं विखे पाटील यांनी यावेळी म्हटलं आहे.

दरम्यान जरांगे पाटील यांनी प्रामाणिकपणे आंदोलन चालवलं. त्यांनी निस्वार्थीपणे आंदोलन केलं. आम्ही जे काही केलं आहे ते कायद्याच्या चौकटीत बसवून विषय मार्गी लावला आहे. तुम्ही त्यांच शिक्षण काढत आहात हे चुकीच आहे, या पुढाऱ्यांना त्यांची दिवाळी साजरी करायची आहे. दिवाळी संपल्यावर ओबीसी नेत्यांना बोलावणार आणि न्यायमूर्ती शिंदे यांना बोलवून त्यांना विषय समजून सांगणार, असं यावेळी राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटलं आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com